# भारताचे एक पाउल विकासाकडे

**डॉ. ममता आर साहू**
सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय, रोहणा
मो. नं 7798110699
ईमेल - mamtadsahu26@gmail.com

---

**प्रस्तावना :**

अर्थ व्यवस्था ही फार कमी काळासाठी संथ असते . अर्थव्यवस्थेत उथल - पुथल होतच असते. महामारी, भूकंप, युद्ध , अतिवृष्टी परंतु वर्तमान स्थितीचा विचार केला तर चीन मधून वूहान शहरातून आलेला कोरोंना विषाणू ने संपूर्ण जगाला महामारीच्या सापळयात फसवून ठेवले आहे.

भारताची आयात – एकाबाजूने भारत देशावर आलेले महामारीचे हे मोठे आर्थिक संकट व दुसऱ्या बाजूने चीन ने केलेले आक्रमण हे ५ मे २०२० रोजी झाले. त्यामुळे संतापलेले मान. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी १२ मे २०२० रोजी 'आत्मनिर्भर भारताची' घोषणा केली. जेव्हा की चीन कडून भारताची आयात १३.२ % निर्यात ४.६०% २०१९ साली होती. चीन, अमेरिका, यू. एस. ई. अरब, इराक, स्विझ्ॅर्लैड , हॉगकाँग, साऊथ कोरिया, इंडोनेशिया, सिंगापूर ह्या मुख्य दहा देशांपासून भारत आयात असतो. भारताने २०१९ ला ४८० बिलियन यू.एस.डी वस्तूची आयाता पैकी ७० बिलियन यू.एस .डी आयात फक्त चीन मधून केली. कोरोंना विषाणू मुळे भारतातील १३.५ करोड लोक बेरोजगार, १२ करोड लोक गरीब झाले.

- कार्ल मार्क्स " संकट हा विकासाचा उगम बिंदु होय."
- आत्म निर्भर म्हणजे काय ?

वर्तमान स्थितीत मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी ची व्याख्या " आयातीचे अवलंबीत्व कमी करून भविष्यात आपण सर्वात मोठे निर्यातदार बनायाचे लक्क्षठेवणे ."

देशातील प्रतेक नागरिकांनी स्वावलंबी होने आवश्यक आहे . भारत हा एक संसाधन पूर्ण देश आहे . भारतात अनेक स्त्रोत उपलब्ध आहेत. उपलब्ध असलेल्या संसाधनाचा मानवाने आपल्या कौशल्य व ज्ञानांच्या बळावर योग्य वस्तु व सामग्री चे उत्पादन करायला पाहिजे. भारतिय नागरिक दुसऱ्या देशावर अवलंबून राहणार नाही . म्हणजेच उपलब्ध संसाधनावर विशिष्यटि करण करून उत्पादनाचे निर्यात करु शकतो . पंतप्रधानांच्या सांगण्यावरून "लोकल से वोकल" आत्मनिर्भर भारतातील नागरिकांनी तेथील क्षेत्रीय संसाधनाचा पुरेपूर वापर करून उद्योगाचे प्रवाह वाढविणे तसेच प्रतेक नागरिकांनी रोजगारक्षम व स्वावलंबी बनविणे ज्या वस्तूची आजपर्यन्त आम्ही चीन पासून स्वस्त दरात आयात करत होतो . त्या वस्तु चे निर्माण आमच्या देशातच करु असा ठाम निर्णय घ्यावा म्हणजेच आपला देश स्वयंपूर्ण होईल .

**" लोकल से वोकल" हयात अंतर्भूत असलेले पांच घटक**

1. क्षेत्रीय ( स्थानिक ) विनिर्माण
2. स्थानिक बाजारपेठ
3. स्थानिक पुरवठा बदल
4. स्थानिक वस्तूंची मांगणी
5. स्थानिक वस्तूंचा प्रचार

स्थानिक नागरिकांनी जर स्थानिक वस्तुना मागणी व प्रचार केला तर नक्किच आत्मनिर्भर भारत निर्माण होईल व तेथील बेरोजगारी कमी होईल म्हणजेच पूर्ण देशाची बेरोजगारी कमी होईल म्हणजेच लोकल वस्तूंचा उपभोग व प्रचार हाच आमचा जीवणमंत्र आहे . ग्लोबल वस्तु सुद्धा कधी स्थानीय वस्तु होते. अश्या वस्तुना प्रबळ मागणी निर्माण होऊन , त्या ग्लोबल बनल्या .

**आत्मनिर्भर भारत अभियांनाचे पांच स्तंभ**

१) अर्थव्यवस्था २) पायाभूत सुविधा ३) तंत्रज्ञान चलित प्रणाली ४) व्हायब्रॅंट डेमोग्राफी ५) मांगणी

आत्मनिर्भर भारत अभियांनाची घोषणा फायनान्स मंत्री श्रीमती . निर्मला सितारमन यांनी अर्थव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी काही योजना प्रारंभ केल्या आहेत . ह्या योजने अंतर्गत सर्व क्षेत्राच्या विकासासाठी एकूण गुंतवणूक करणारी रक्कम ५.५४ लाख करोंड करणार आहे.

आत्मनिर्भर भारत अंतर्गत भारत सरकार द्वारे १२ योजना सुरू करणार त्या खालील प्रमाणे आहेत.

१) स्वयरोजगार भारत रोजगार योजना
२) आपत्कालीन क्रेडिट लाइन हमी योजना
३) स्वावलंबन उत्पादन जोडलेली प्रोत्साहन योजना
४) प्रधानमंत्री आवास योजना ( शहरी )
५) बाधकांम आणि पायाभूत क्षेत्राला समर्थन
६) घरमालक आणि घरखेरेदीदारानां आयकर सवलत
७) कृषी सहाय्यक खत
८) प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना
९) प्रकल्प निर्यातीला चालना देणे
१०) भांडवल आणि औद्योगिक प्रेरणा
११) कोविड – १९ लस संशोधन व विकासासाठी योजना
१२) एल. टी. सी. कॅश व्हाउचर योजना

“आत्मनिर्भर भारत” भारताच्या विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधा मजबूत करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपट्ट करणे, सुशासन, तरुणांसाठी अधिकारी, महिला सक्षमीकरण आणि इतर विकासावर लक्ष केंद्रित करणे, सन २०२०-२१ चे सर्वसाधारण अर्थसंकल्प आरोग्य, शारीरिक आणि आर्थिक भांडवल आणि पायाभूत सुविधांवर आधारित आहे. सक्षम भारतासाठी सर्वसमावेशक वाढ, मानवी भांडवलाचा पुनर्विकास, नूतनीकरण आणि अनुसंसाधन व विकास आणि प्रशासनाचे अधिकाधिक प्रयत्न आणि नागरिकांचा सहवास यावर आधारित आहे.

**" आत्मनिर्भर भारताचे फायदे"**

- देशात उद्योगाची वाढ होईल.
- देशात प्रत्येक तरुण / तरुणी यशस्वी, सक्षम , रोजगाराची संधी प्राप्त होईल.
- राहणीमान ऊंचावेल, शिक्षणाचा दर्जा वाढेल.
- दरडोई उत्पन्न, राष्ट्रीय उत्पन्न वाढेल.
- गरिबितून देश मुक्त होईल.
- आर्थिक व्यवस्था सुदृढ होईल.
- निर्यात वाढेल.

**निष्कर्ष :**

भारत हा विशाल क्षेत्रफळ असलेला देश, ह्या देशातील सांस्कृतिक भिन्नता, भौगोलिक भिन्नता, राहणीमान भिन्नता, संसाधनात भिन्नता, परंतु स्थानिक वस्तूंचे उत्पादन ह्या उत्पादनाची विदेशात विक्री व प्रचार उद्योगानाही परत चालना मिळेल. बेरोजगारी संपेल. देश विकासंकडे पाउल टाकेल. शिक्षणाला व्यवसायाची जोड मिळेल देशाचा विकास होईल आशावादी वातावरण बनेल जास्तीत जास्त घटक क्रियाशील होईल. निराशावादी वातावरण आटोक्यात येऊन संपूर्ण उत्साहवादी अर्थव्यवस्थाची निर्मिती होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- www.financialexpress.com
- https%@@www.livehindustan.com
- pmmodi yojana.in